आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांसाठी शिक्षकेतर पदांच्या संचमान्यतेचे निकष निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अआशा-२०१९/ प्र.क्र.१२३/ का.११
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: २० ऑगस्ट, २०१९

वाचा :

१) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, आश्रमशाळा संहिता २०१९.
२) शासन निर्णय,सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्र.इडीडी-२००३/प्र.क्र.३४०/भाग-३/सुधार-२, दि.१८ ऑगस्ट, २००४.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१, दि.२ फेब्रुवारी, २०१३.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/विसु-१, दि.२ डिसेंबर, २०१३.

प्रस्तावना :

आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यात शासनामार्फत निवासी शासकीय आश्रमशाळा तसेच स्वयंसेवी संस्थामार्फत निवासी अनुदानित आश्रमशाळा चालविण्यात येतात. सदर शासकीय आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांसाठी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांबाबतचे निकष संदर्भाधीन क्र.१ येथील आश्रमशाळा संहिता २०१९ मध्ये निश्चित केले आहेत. त्याअनुषगाने आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकेतर पदांच्या संचमान्यतचे निकष निश्चित करणेबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय:

राज्यातील आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा व स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्व अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आकृतीबंध निश्चित करण्यासंदर्भातील यापूर्वीचे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून पुढीलप्रमाणे सुधारित आकृतीबंध लागू करण्यात येत आहे :-

अ.क्र.	पदनाम	विद्यार्थी संख्या	अनुज्ञेय पदे	अभिप्राय
१	कनिष्ठ लिपिक	इयत्ता १ ली ते १० वी किंवा इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत	१	माध्यमिक आश्रमशाळेसाठी अनुज्ञेय (इयत्ता ९ वी चा वर्ग सुरु झाल्यानंतर पद भरती करण्यात येईल)
२	ग्रंथपाल	इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंत	१	आश्रम शाळेत उच्च माध्यमिकचे वर्ग मंजूर व सुरु असल्यास (इयत्ता ११ वी चा वर्ग सुरु झाल्यानंतर पदभरती करण्यात येईल)
३	प्रयोगशाळा परिचर किंवा प्रयोगशाळा सहायक	इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंत किंवा इयत्ता ६ वी ते १२ वी पर्यंत	१	माध्यमिकचा इयत्ता ९ वी चा वर्ग सुरु असल्यास प्रयोगशाळा परिचर किंवा उच्च माध्यमिकचा (विज्ञान शाखा) इयत्ता ११ वी चा वर्ग मंजूर व सुरु असल्यास प्रयोगशाळा सहायक यापैकी एक पद भरता येईल. प्रयोगशाळा परिचर अर्हता धारण करत असल्यास त्यास प्रयोगशाळा सहायक म्हणून पदोन्नती देता येईल.
४	अधिक्षक (पुरुष)	१ ते २०० पर्यंत (निवासी विद्यार्थी)	१	वसतीगृहासाठी
		२०१ च्या पुढे सहायक अधिक्षक	१	
५	अधीक्षिका (स्त्री)	१ ते २०० पर्यंत (निवासी विद्यार्थिनी)	१	वसतीगृहासाठी
		२०१ च्या पुढे सहायक अधिक्षिका	१	

वरील अ.क्र. ४ व ५ अधिक्षक/अधीक्षिका ची पदे ही शाळेच्या एकत्रित निवासी विद्यार्थी व विद्यार्थिनी संख्येवर आधारित असतील. त्यासाठी आश्रमशाळेच्या ३ कि.मी. परिघाबाहेरील एकत्रित निवासी विद्यार्थी संख्या २०० पेक्षा जास्त असल्यास सहायक अधिक्षक किंवा अधीक्षिका हे पद अनुज्ञेय राहील.

६	बहुउद्देशीय कर्मचारी (स्वयंपाकी, कामाठी, मदतनीस व शिपाई तसेच अन्य पदनाम विहित केलेले वर्ग ४ चे कर्मचारी)	३० (निवासी)	१	ज्या आश्रम शाळेत माध्यमिक / उच्च माध्यमिक वर्ग असतील त्या ठिकाणी एकूण अनुज्ञेय पदांपैकी एक पद शिपाई पदामध्ये वर्ग करावे.

७	सफाईगार	१ ते २०० पर्यंत	१	एकूण २ पैकी १ महिला असणे आवश्यक
		२०१ च्या पुढे	१	
८	पहारेकरी	प्राथमिक आश्रमशाळा (इयत्ता १ ली ते ८ वी)	१	
		माध्यमिक /उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी)	१	

३. वरील निकषानुसार एखाद्या आश्रमशाळेत कर्मचारी अतिरिक्त ठरत असल्यास त्यांना त्याच संस्थेच्या इतर आश्रमशाळेत समायोजित करण्यात येईल. त्याच संस्थेच्या इतर आश्रमशाळेत पद रिक्त नसल्यास त्यांना संबंधित अपर आयुक्त क्षेत्रातील इतर संस्थांमध्ये समायोजित करण्यात येईल. समायोजनासाठी रिक्त जागा शिल्लक नसल्यास शिक्षेकतर कर्मचाऱ्यांची पदे त्याच संस्थेत सदरचे कर्मचारी त्या पदावरुन सेवानिवृत्त होईपर्यंत कार्यरत राहतील तसेच सदर कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनंतर अतिरिक्त ठरलेली पदे आपोआप व्यपगत होतील. आश्रमशाळांमधील सर्व अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन झाल्याशिवाय कोणत्याही संस्थेस पदभरतीची मान्यता देण्यात येणार नाही. पदभरतीपूर्वी अपर आयुक्त/प्रकल्प अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे.

४. वरील अ. क्र. ४ व ५ वरील सहायक अधिक्षक/अधिक्षिका पदांसाठी वेतनश्रेणी ही ६ व्या वेतन आयोगातील ग्रेड वेतन रु.१९०० ला अनुसरुन ७ व्या वेतन आयोगातील वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर एस-६ : १९९००-६३२०० अशी राहील. सदर पदाची अर्हता आर.ए.एन.एम/आर.जी.ए.एन.एम./डी.फार्म किंवा तत्सम पॅरामेडीकल पदवी ही राहील. सन २०१९-२० या शैक्षणिक सत्रातील निवासी विद्यार्थी संख्या तसेच मागील दोन वर्षातील विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन मानधन तत्वावर भरता येईल. विहित विद्यार्थी संख्या सलग तीन वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी नियमित राहिल्यास त्यांची सेवा नियमित करता येईल.

५. अ. क्र. ६ ते ८ ही पदे या शासन निर्णयातील निकषानुसार निर्माण होणारी अतिरिक्त नवीन पदे संचमान्यतेनंतर मंजूर करण्यात येतील. बहुउद्देशिय कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल. अ.क्र.७ व ८ येथील पदांची अर्हता व वेतनश्रेणी शासकीय आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे राहील. सदर पदे प्रथम तीन वर्षासाठी मानधन तत्वावर भरण्यात येतील. संचमान्यतेनंतर सलग ३ वर्षाची निवासी विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन ४ थ्या वर्षी सदर पदांना कायम मान्यता देण्यात येईल.

६. संचमान्यतेसाठी सर्व आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांनी ऑनलाईन पोर्टलवर दरवर्षी दिनांक ३० सप्टेंबर अखेरपर्यंत माहिती भरावी. दरवर्षी ३० सप्टेंबर अखेरची विद्यार्थी संख्या संचमान्यतेसाठी ग्राह्य धरण्यात यावी. ३० सप्टेंबर अखेरच्या विद्यार्थीसंख्येनुसार प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावेत. संचमान्यतेस शासनाकडून मंजूरी घेणे आवश्यक राहील. संचमान्यता मंजूर झाल्याशिवाय कोणतीही अतिरिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात येणार नाही.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२०१६३३२७१६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.08.20 16:38:43 +05'30'

(सु.ना.शिंदे)
उपसचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक
७. मा.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१०.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
११.आयुक्त महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, पुणे.
१२.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१३.सर्व सह सचिव/उप सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
१४.अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती/नागपूर
१५.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१६.अवर सचिव (का-१५), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.कक्ष अधिकारी (का-१३), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. निवडनस्ती (का.११) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२